मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# शहरात 'जीबीएस'चा पहिला बळी

## पिंपळे गुरव मधील ओला-उबेर चालकाचा मृत्यू : वैद्यकीय विभागाची माहिती

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवडमध्ये गुलेन बॅरि सिंड्रोममुळे (जीबीएस) ३६ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला आहे. महापालिकेच्या वायसीएम रुग्णालयाच्या ऑडिट रिपोर्टमध्ये ही जीबीएसमुळे हा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले आहे. वैद्यकीय विभागाचे प्रमुख डॉ. लक्ष्मण गोफणे यांनी ही माहिती दिली आहे.



पिंपळे गुरव भागात राहणारा हा तरुण ओला-उबेरचा चालक असून तो २१ जानेवारीला वायसीएम रुग्णालयात दाखल झाला होता. मात्र त्याची तब्येत खालावलेली होती, त्यामुळं पहिल्याच दिवशी त्याला व्हेंटिलेटरवर घ्यावे लागले होते. तो ओला-उबेर चालक असल्याने त्याने कोणत्या परिसरातील पाणी प्यायल्याने त्याला जीबीएसची लागण झाली, याचा शोध लागत नाही.

याबाबत वैद्यकीय विभागाचे अधिकारी प्रमुख डॉ.लक्ष्मण गोफणे यांनी म्हटले आहे की, वायसीएम रुग्णालयाच्या ऑडिट रिपोर्ट नुसार या रुग्णाला जीबीएसची लागण झाली होती. तो पिंपळे गुरव मध्ये राहत असून ओला उबेरचा चालक होता. हा रुग्ण वायसीएममध्ये दाखल झाला तेव्हा त्याला ताप, खोकला आणि प्रचंड अशक्तपणा होता. त्यामुळे ॲडमिट होताच त्याला व्हेंटिलेटरवर घेण्यात आले होते. दहा दिवस या रुग्णाला एक्सपोर्टच्या सल्ल्यानुसार उपचार केले होते. मात्र रुग्णाकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्यामुळे त्याचा काल उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे.

तो ओला- उबेरचा चालक होता. संपूर्ण पुणे जिल्ह्यात त्याला फिरावं लागत होते. घरच्यांनी माहिती दिल्यानुसार तो सकाळी डबा घेऊन बाहेर पडायचा ते रात्रीच घरी येत असे. त्यामुळे दिवसभर नेमके त्यांनी कुठे अशुद्ध पाणी प्याले हे शोधणे अवघड आहे. महापालिकेने पिंपळे गुरव येथील त्याच्या घराच्या परिसरातील पाण्याची तपासणी केली, मात्र ते पाणी पिण्या योग्य असल्याचा अहवाल पाणीपुरवठा विभागाकडून आला आहे.

---

# इंद्रायणी थडी महोत्सवासाठी स्टॉल बुकिंगसाठी प्रचंड प्रतिसाद!

## 2 हजार स्टॉलसाठी महाराष्ट्रभरातील बचतगटांची रस्सीखेच : नियोजन समितीच्या समन्वयक मुक्ता गोसावी यांची माहिती

**पिंपरी | प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील सर्वात मोठा इंद्रायणी थडी महोत्सवात स्टॉल मिळवण्यासाठी बचतगटांची अक्षरश: झुंबड उडाली आहे. यंदा 2 हजार स्टॉल उभारण्यात येणार असून, त्यासाठी ऑनलाईन व ऑफलाईन अर्ज स्वीकारण्यात येत आहेत. आतापर्यंत 3 हजार 700 हजाराहून अधिक अर्ज दाखल झाले आहेत. त्यामुळे ‘लकी ड्रॉ’ द्वारे स्टॉल वाटप करण्यात येईल, अशी माहिती नियोजन समितीच्या समन्वयक मुक्ता गोसावी यांनी दिली.




भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून आणि शिवांजली सखी मंच्या अध्यक्षा पुजा लांडगे यांच्या पुढाकाराने प्रतिवर्षी महिला सक्षमीकरण आणि उद्योजकता प्रोत्साहन या हेतूने इंद्रायणी थडी महोत्सवाचे आयोजन केले जाते.

यावर्षी मोशी येथील धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज अंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्राच्या मैदानावर दि. 27 व 28 फेब्रुवारी 2025 आणि दि. 1 व 2 मार्च 2025 असे चार दिवस इंद्रायणी थडी महोत्सव भरवण्यात येणार आहे. “सन्मान स्त्री शक्तीचा.. अभिमान भारतीय संस्कृतीचा..” असे घोषवाक्य आहे. या महोत्सवामध्ये स्टॉलसाठी 9379909090 या क्रमांकावर संपर्क साधावा. तसेच, स्टॉल वाटप पूर्णत: मोफत (नि:शुल्क) आहे. ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी HTTPS:// SHORTURL.AT/QQBXU या लिंकवर फॉर्म भरावा. येत्या दि. 5 फेब्रुवारीपर्यंत अर्ज भरण्याची मुदत आहे. दि.8 फेब्रुवारीपर्यंत स्टॉल वाटप लॉटरी प्रक्रिया पूर्ण होईल, अशी माहिती नियोजन समितीने दिली आहे.

### स्वादिष्ट मेजवानी अन् मनोरंजनाचा अस्वाद..!

» इंद्रायणी थडी महोत्सवामध्ये शाकाहारी- मासांहारी खाद्यपदार्थांचे स्टॉल, घरगुती जीवनाश्यक वस्तू, खेळणी, कपडे, ज्वेलरी, कटलरी, सौंदर्य प्रसाधने, सुका मेवा, खाद्य उत्पादने, कृषी उत्पादने, आरोग्य आणि व्यायाम संबंधित उत्पादने यासह डान्स, फॅशन शो, शस्त्र प्रदर्शन, पुस्तक प्रदर्शन, गायन, फोटोग्राफी, रांगोळी, मेहंदी, मंगळागौरी सांस्कृतिक कार्यक्रम असे भरगच्च कार्यक्रम होणार आहेत. त्यामुळे पुणे, पिंपरी-चिंचवडसह महाराष्ट्रभरातील नागरिकांनी या महोत्साचा आनंद लुटावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# वर्षात अडीच हजार कोटींची कामे

## जिल्ह्यासाठी तेराशे कोटींसह 753 कोटींच्या अतिरिक्त निधीला 'डीपीसी'मध्ये मंजुरी

**पुणे | प्रतिनिधी**

जिल्हा वार्षिक योजना, अनुसूचित जाती उपाययोजना तसेच आदिवासी उपाययोजनांसाठीचा एकूण १ हजार २९९ कोटी ५८ लाख रुपयांच्या प्रारूप आराखड्याला जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत गुरुवारी मान्यता देण्यात आली. तसेच, ७५३ कोटींच्या अतिरिक्त मागणीलाही मंजुरी देण्यात आली. त्यामुळे पुढील आर्थिक वर्षासाठी (२०२५-२६) एकूण दोन हजार ५२ कोटींची कामे जिल्ह्यात होणार आहेत. आराखड्यात आदर्श शाळा आणि स्मार्ट प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या उभारणीला प्राधान्य देण्यात आले आहे.



उपमुख्यमंत्री, पालकमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समितीची बैठक झाली. त्यामध्ये या आराखड्याला मंजुरी देण्यात आली. राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, क्रीडा आणि युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, खासदार डॉ. मेधा कुलकर्णी, सुप्रिया सुळे, सुनेत्रा पवार, आमदार अमित गोरखे, योगेश टिळेकर, दिलीप वळसे पाटील, विजय शिवतारे, भीमराव तापकीर, राहुल कुल, सुनील शेळके, चेतन तुपे, सिद्धार्थ शिरोळे, शरद सोनावणे, माऊली कटके, बापू पठारे, बाबाजी काळे, शंकर मांडेकर, राज्याच्या सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव, जिल्ह्याच्या पालक सचिव व्ही. राधा, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पोलीस आयुक्त अमितेश कुमार, महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, पिंपरीचे महापालिका आयुक्त शेखर सिंह, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, ग्रामीण पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, जिल्हा नियोजन अधिकारी किरण इंदलकर यावेळी उपस्थित होते.

जिल्ह्यासाठी १ हजार ९१ कोटी ४५ लाख रुपयांचा प्रारूप आराखडा आणि अतिरिक्त ७०० कोटीं रुपायांची मागणी या बैठकीत करण्यात आली. अनुसुचूत जाती उपाययोजनेअंतर्गत १४५ कोटी रुपये, आदिवासी उपाययोजनेसाठी ६३ कोटी १३ लाख रुपयांचा प्रारूप आराखडा आणि ५३ लाख १ हजार रुपयांच्या अतिरिक्त खर्चालाही या बैठकीत मान्यता देण्यात आली.

दरम्यान, शहर आणि जिल्ह्यातील ऐतिहासिक ठिकाणे, धार्मिका महत्त्वाची ठिकाणे, गड किल्ले, स्मारके लक्षात घेऊन एकात्मिक पर्यटन विकास आराखडा करण्यात यावा, अशी सूचना अजित पवार यांनी यावेळी केली. या आराखड्यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून निधी देण्यात येईल. तसेच कंपन्यांच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीतूनही अधिकाधिक निधी मिळविण्यासाठी प्रशासनाने प्रयत्न करावेत. राज्याच्या पर्यटन विभागाकडूनही निधी उभारण्यासाठी पाठपुरावा करावा, असेही पवार यांनी सांगितले.

### आदर्श शाळा, आरोग्य केंद्रांना प्राधान्य

» जिल्हा नियोजन समितीच्या आराखड्यात आदर्श शाळा आणि स्मार्ट प्राथमिक आरोग्य केंद्र उभारणीला प्राधान्य देण्यात आले आहे. प्रत्येक तालुक्यात केंद्र शाळा स्तरावर एका मोठ्या शाळेचा भौतिक तसेच दर्जात्मक विकास करण्यात येणार आहे. दर वर्षी ३०३ शाळा आदर्श करण्यात येणार आहेत. पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकांनीही शहरात आदर्श शाळा कराव्यात, असे पवार यांनी सांगितले. जिल्ह्यात स्मार्ट प्राथमिक आरोग्य केंद्र उभारण्यात येणार आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या दुरुस्तीसाठी आवश्यक तो निधीही दिला जाणार आहे. या केंद्रात औषधोपचारही तातडीने केले जाणार आहेत.

# रूग्णांच्या संपर्कात आल्याने जीबीएस आजाराची लागण होत नाही

## पिण्याचे पाणी उकळून गार करूनच प्या : ही लक्षणे जाणवल्यास थेट दवाखाना गाठा

**पिंपरी | प्रतिनिधी**

गुलेन बॅरि सिंड्रोम या आजारामध्ये बाधित रुग्णांची प्रतिकारशक्ती मज्जातंतूवर आघात होऊन हा आजार संभावतो. या आजाराची लागण सर्व वयोगटातील व्यक्तींना होऊ शकते. अत्यल्प रूग्णांमध्ये गंभीर स्वरुपाची लक्षणे आढळून येतात. दुषित पाण्याद्वारे या आजाराची बाधा होण्याची शक्यता गृहीत धरून महापालिकेने त्या दृष्टीने उपाययोजना सुरु केल्या आहेत.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रात आजअखेर गुलेन बॅरि सिंड्रोम आजाराचे संशयीत रुग्ण १३ आहेत. यापैकी ५ रुग्ण बरे होऊन घरी सोडण्यात आलेले आहेत तसेच सर्व दाखल रुग्णांची प्रकृती स्थिर आहे. या आजाराचे रुग्ण आढळून आलेल्या परिसरात सर्वेक्षण करण्याकरिता ८ रुग्णालय झोन अंतर्गत प्रत्येकी दोन असे एकूण १६ पथके तयार करण्यात आली आहेत. या पथकांमार्फत आजअखेर १० हजार ४३ घरे तपासण्यात आली असून यामध्ये गुलेन बॅरि सिंड्रोम आजाराचा एकही रुग्ण आढळून आलेला नाही.




या आजारावर उपचारासाठी आवश्यक असणारे औषधोपचार पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पिंपरी येथील कै. यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय व इतर रुग्णालयांत उपलब्ध आहेत. तसेच या आजाराचे उपचार "एकत्रित महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजना" मध्ये समाविष्ट असून वायसीएम रुग्णालय आणि नवीन थेरगाव रुग्णालयामध्ये या योजनेअंतर्गत रुग्णांकरिता मोफत उपचार उपलब्ध आहेत. (दि. २९) रोजी या आजाराबाबत आढावा घेणे तसेच वैद्यकीय व्यावसायिकांमध्ये याबाबत जागृती करण्याकरिता वेबिणार चे आयोजन करण्यात आले होते.

या वेबिणार मध्ये ८०२ वैद्यकीय व्यावसायिकांनी सहभाग घेतला. यामध्ये शहरातील नामांकित खाजगी वैद्यकीय डॉ. अनिरुद्ध टोनगावकर, डॉ. पांडे व डॉ. कुलकर्णी यांनी सर्वांना मार्गदर्शन केले. मनपा वैद्यकीय विभागतर्फे आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे व अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार यांनी मार्गदर्शन केले. महापालिकेचा पाणीपुरवठा होत असताना कोणत्याही परिस्थितीत दुषित पाण्याचा शिरकाव होणार नाही याची दक्षता घेण्याचे निर्देश संबधित विभागांना देण्यात आले आहेत. या आजाराची प्राथमिक लक्षणे आढळलेले संशयित रुग्ण ज्या भागात वास्तव्य करतात त्या परिसरात महापालिकेच्या नळाद्वारे पुरविल्या जाणा-या पाण्याचे नमुने तपासण्याची मोहीम तीव्र करण्यात आलेली आहे. हा आजार संसर्गजन्य नसुन रुग्णाच्या संपर्कात आल्याने सदरच्या आजाराची लागण होत नाही. या आजारावर निश्चित औषधोपचार उपलब्ध आहेत. पिंपरी चिंचवड मनपा मार्फत या आजाराच्या माहिती व शंका निरसन करण्यासाठी हेल्पलाईन तयार करण्यात येणार आहे. त्यामुळे नागरिकांनी घाबरून जाऊ नये. लक्षणे आढळून आल्यास त्वरित मनपाच्या नजीकच्या रुग्णालयात तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

### आजाराची लक्षणे..

» हातापायातील ताकद कमी होणे.
» हातापायाला मुंग्या (tingling sensations) येणे.
» गिळण्यास व बोलणेस त्रास होणे.
» धाप लागणे/श्वास घेण्यास त्रास होणे.

# अर्थसंकल्पाची तयारी अंतिम टप्प्यात; नागरी सहभाग वाढवण्यासाठी विशेष तरतूद

## महापालिकेच्या लेखा विभागानुसार, हा अर्थसंकल्प फेब्रुवारी 2025 च्या दुसऱ्या आठवड्यात जाहीर करण्यात येईल

**पिंपरी | प्रतिनिधी**

नवीन आर्थिक वर्ष सुरू होण्याच्या मार्गावर असताना पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने आगामी २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पाची तयारी सुरू केली आहे. महापालिकेच्या लेखा विभागानुसार, हा अर्थसंकल्प फेब्रुवारी २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात जाहीर करण्यात येईल




नवीन आर्थिक वर्ष सुरू होण्याच्या मार्गावर असताना पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने आगामी २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पाची तयारी सुरू केली आहे. महापालिकेच्या लेखा विभागानुसार, हा अर्थसंकल्प फेब्रुवारी २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात जाहीर करण्यात येईल. प्रशासकीय राजवटीखाली सादर होणारा सलग तिसरा अर्थसंकल्प असल्याने प्रशासनाच्या दृष्टिकोनातून हा अर्थसंकल्प महत्त्वाचा ठरणार आहे असून, शहरवासीयांना कोणत्या नव्या योजना, सुविधा आणि सवलती मिळणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

यावेळी अर्थसंकल्पामध्ये प्रथमच 'क्लायमेट बजेट'चा समावेश करण्यात आला आहे. तसेच, नागरिकांनी सुचवलेल्या योजनांसाठी १० टक्के विशेष निधीची तरतूद केली जाणार आहे. महापालिकेचा यंदाचा अर्थसंकल्प पूर्णतः डिजिटल स्वरूपात म्हणजेच ई-अर्थसंकल्प असणार आहे. अत्यावश्यक, आवश्यक आणि तातडीच्या कामांना प्राधान्य देण्याचा यात समावेश असेल. सर्व विभागप्रमुखांच्या बैठका घेऊन त्याला अंतिम स्वरूप दिले जात आहे. महापालिका आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली अर्थसंकलपला अंतिम रूप देण्याचे काम सुरू आहे. फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यात याची अधिकृत घोषणा केली जाईल.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या या अर्थसंकलपात विशेष म्हणजे यंदा 'क्लायमेट बजेट' चा समावेश होणार आहे. वाढत्या प्रदूषणामुळे पर्यावरणीय संकट निर्माण झाले आहे, ज्याचा परिणाम प्राणी, पक्षी आणि निसर्गावर होत आहे. हे संकट कमी करण्यासाठी महापालिकेने पर्यावरणीय सुधारणा करण्याच्या दृष्टीने योजना आखल्या आहेत. त्याअंतर्गत शहरातील हवा स्वच्छ ठेवणे, प्रदूषण नियंत्रणासाठी उपाययोजना राबवणे यांसारख्या गोष्टींवर भर दिला जाईल. मुंबईनंतर, वार्षिक अर्थसंकल्पात "क्लायमेट बजेटचा" समावेश करणारी पिंपरी-चिंचवड महापालिका महाराष्ट्रातील दुसरी महापालिका ठरणार आहे. तसेच, उत्कृष्ट आणि नाविन्यपूर्ण कल्पना सुचवणाऱ्या नागरिकांचा महापालिकेतर्फे सन्मान करण्यात येईल आणि त्यांना पुरस्कारही देण्यात येणार आहेत. एकूणच, पिंपरी-चिंचवड महापालिकेचा आगामी अर्थसंकल्प केवळ शहराच्या मूलभूत गरजांसाठी नसून पर्यावरणीय सुधारणा आणि नागरी जीवनमान उंचावण्याच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण पाऊल असेल.

### नागरी सहभाग वाढवण्यासाठी

» यंदाच्या अर्थसंकल्पात नागरिकांना त्यांचा सक्रिय सहभाग नोंदवता यावा, यासाठी महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह यांनी नव्या उपक्रमाची सुरुवात केली आहे. या उपक्रमांतर्गत, नागरिकांनी सुचवलेल्या योजनांसाठी एकूण बजेटच्या १०% निधीची तरतूद करण्यात आली आहे. यामुळे शहरातील गरजांनुसार नागरी सुविधांचा विकास होण्यास मदत होईल. सुमारे २,२८४ नागरिकांनी महानगरपालिकेला त्यांच्या गरजांनुसार विविध योजना सुचवल्या आहेत. यातील सर्वोत्तम आणि आवश्यक गरजेच्या योजनांना निधी दिला जाईल. गरजेनुसार यासाठी अतिरिक्त निधीही मंजूर केला जाईल. तसेच, उत्कृष्ट आणि नाविन्यपूर्ण कल्पना सुचवणाऱ्या नागरिकांचा महापालिकेतर्फे सन्मान करण्यात येईल आणि त्यांना पुरस्कारही देण्यात येणार आहेत. एकूणच, पिंपरी-चिंचवड महापालिकेचा आगामी अर्थसंकल्प केवळ शहराच्या मूलभूत गरजांसाठी नसून पर्यावरणीय सुधारणा आणि नागरी जीवनमान उंचावण्याच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण पाऊल असेल. नागरी सहभाग आणि हरित विकासावर भर देणारे हा अर्थसंकल्प शहराच्या भविष्यकालीन प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

# आपत्ती व्यवस्थापनासाठी आता पीडीआरएफची स्थापना

## शहरातील पूरपरिस्थिती आणि राष्ट्रीय महामार्गांवरील अपघातांच्या घटनांवेळी आपत्ती व्यवस्थापनासाठी आता पीडीआरएफची स्थापना करण्यात आली आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

जिल्ह्यातील भुशी डॅम दुर्घटना, पुणे शहरातील पूरपरिस्थिती आणि राष्ट्रीय महामार्गांवरील अपघातांच्या घटनांवेळी आपत्ती व्यवस्थापनासाठी आता पीडीआरएफची स्थापना करण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते प्रजासत्ताक दिनी या पथकासाठी देण्यात आलेल्या वाहनांचे लोकार्पण करण्यात आले. राज्यात ठाणे नंतर पुण्यात पुणे महानगर आपत्ती प्रतिसाद पथक (पीडीआरएफ) स्थापन करण्यात आले आहे.



पीडीआरएफसाठी शासनाने ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असून प्रारंभी यासाठी ३० प्रशिक्षित जवानांची नियुक्ती करण्यात आली आहे. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अखत्यारीत असलेल्या भागात डोंगराळ भाग, जुन्या इमारती, धरणे, तलाव आणि महामार्गांवरील दुर्घटनांच्या संभाव्य धोक्यांना तोंड देण्यासाठी जलद प्रतिसाद देणारी आणि अत्याधुनिक संसाधनांनी सज्ज यंत्रणा नव्हती. त्यामुळे एनडीआरएफ, एसडीआरएफच्या धर्तीवर पीडीआरएफची स्थापना करण्यात आली आहे.

या पथकासाठी ३२ आसनी ट्रूप कॅरियर बस, टेम्पो आणि पिक-अप व्हॅन अशी वाहने खरेदी करण्यात आली असून, त्यांचे लोकार्पण शिवाजीनगर येथील पोलीस मुख्यालय मैदानावर प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. योगेश म्हसे, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पीएमआरडीएचे मुख्य अग्निशमन अधिकारी देवेंद्र पोटफोडे यांच्यासह अधिकारी, मान्यवर उपस्थित होते.

> “ प्राधिकरणाच्या भौगोलिक परिस्थितीमधील आव्हाने लक्षात घेता नागरिकांना राहण्याकरीता सुरक्षित व आपत्ती व्यवस्थापन सक्षम असावे, यासाठी अग्निशमन दलाच्या मदतीकरीता पुणे महानगर आपत्ती प्रतिसाद पथकाची निर्मिती करण्यात आली आहे. या पथकाच्या माध्यमातून अत्यंत कुशल पध्दतीने विमोचन, मदत व पुर्नवसन कार्य, नियमित आणि कठोर प्रशिक्षण, पुर्नप्रशिक्षण, सराव, विविध कवायती, जनजागृती, जबाबदार असणाऱ्या कार्यक्षेत्रात क्षमता पूर्नबांधणी, विविध यंत्रणांबरोबर एकत्रित रंगीत तालीम प्रस्तावित आहे.
>
> - डॉ. योगेश म्हसे, आयुक्त, पीएमआरडीए

### प्रभावी आपत्ती व्यवस्थापनावर भर

» भविष्यात पुणे महानगर आपत्ती प्रतिसाद पथकाला (पीडीआरएफ) अधिक सक्षम करण्यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ, अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि प्रभावी आपत्ती व्यवस्थापन धोरणे राबवली जाणार आहे. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पोलीस प्रशासन आणि जिल्हा प्रशासन यांच्या समन्वयाने पीडीआरएफ आगामी काळात देशातील आपत्ती व्यवस्थापनात एक आदर्श मॉडेल ठरणार असल्याचा पीएमआरडीएला विश्वास आहे.

# दूध व्यवसायाला लागली घरघर! निवडणुकीनंतर अनुदान पूर्णपणे बंद

## सरकारने दूध उत्पादक शेतकऱ्यांना दिले जाणारे सात रुपये अनुदान पूर्णपणे बंद केल्याने दूध व्यवसाय आर्थिक संकटात

**पुणे | प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुका झाल्यानंतर सरकारने दूध उत्पादक शेतकऱ्यांना दिले जाणारे सात रुपये अनुदान पूर्णपणे बंद केल्याने दूध व्यवसाय आर्थिक संकटात सापडला आहे. दूध व्यवसायाला सरकारने भरीव मदत केल्यावरच दूध व्यवसाय सावरेल, अन्यथा दूध व्यवसाय ग्रामीण भागाचा आर्थिक कणा तुटण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. सरकारने दूध व्यवसायवाढीसाठी आणि शेतकऱ्यांना आर्थिक बळ देण्यासाठी पावले उचलावीत, असे आवाहन दूध उत्पादक शेतकऱ्यांनी सरकारला केले आहे.

राज्य सरकारने निवडणुकीच्या आधी दुधाला 3.5 आणि 8.5 एसएनएफला 30 रुपये लिटर दर व लिटरला 5 रुपये अनुदान देण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर हा निर्णय बदलून 3.5 आणि 8.5 एसएनएफला 28 रुपये दर व 7 रुपये अनुदानाचा निर्णय घेतला.

हे अनुदान नोव्हेंबरपर्यंतच होते. सद्य:स्थितीत दुधाला लिटरला 28 रुपये मिळणारा दर 30 रुपये झाला असला, तरी पशुखाद्याचे दर गगनाला भिडले आहेत. पशुकांडीच्या दरामध्ये याअगोदरच वाढ झाली असून, आता भुश्याचे दर 130 ते 140 रुपयांनी वाढले आहेत. त्यामुळे दूध उत्पादक शेतकरी पुरता अडचणीत सापडला आहे.



### गायींच्या किमती घसरल्या

» दूध व्यवसाय अडचणीत आल्यामुळे गायींच्या किमती कमी झाल्यामुळे 70 ते 80 हजार रुपयांपासून एक लाख रुपयांपर्यंत विकत घेतलेल्या गायी कवडीमोल भावाने मागितल्या जातात. त्यामुळे गायी विकणे देखील अवघड झाले आहे. 'एका बाजूला आड तर दुसऱ्या बाजूला विहीर' अशी अवस्था शेतकऱ्यांची झाली आहे. या परिस्थितीमध्ये सरकारने जर मार्ग काढला नाही, तर मग मात्र दूध व्यवसाय पूर्ण मोडकळीस आल्याशिवाय राहणार नाही.

एका बाजूला चाऱ्याचा भाव देखील मोठ्या प्रमाणात वाढला असून, इतरही खर्च मोठ्या प्रमाणामध्ये वाढला आहे. त्यामुळे पुन्हा एकदा दूध उत्पादक शेतकरी अडचणीत सापडला आहे. त्यामुळे हा दूध व्यवसाय करायचा कसा? हा प्रश्न शेतकऱ्यांना भेडसावत आहे. 8पान 4 वर

एका बाजूला जनावरे सांभाळावी की लेकराबाळांना सांभाळावे? असा गंभीर प्रश्न दूध उत्पादक शेतकऱ्यांपुढे निर्माण झाले आहे. आजच्या परिस्थितीमध्ये दूध व्यवसायातील आर्थिक व्यवहारामध्ये शेण देखील शेतकऱ्यांच्या हातात राहत नाही, दूध व्यवसाय आर्थिक संकटात सापडला आहे. दूध व्यवसायाला सरकारने भरीव मदत केल्यावरच दूध व्यवसाय सावरेल, अन्यथा दूध व्यवसाय ग्रामीण भागाचा आर्थिक कणा तुटण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. सरकारने दूध व्यवसायवाढीसाठी आणि शेतकऱ्यांना आर्थिक बळ देण्यासाठी पावले उचलावीत, असे आवाहन दूध उत्पादक शेतकऱ्यांनी सरकारला केले आहे. असे दूध उत्पादक शेतकरी सांगतात.

दरम्यान, दुधामध्ये भेसळीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. या भेसळखोरांना आवर घातली नाही आणि दूध उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा दिला नाही तसेच दुधाचे दर वाढविण्यासाठी तातडीने पावले उचलली नाहीत, तर पुन्हा एकदा दूध उत्पादक शेतकऱ्यांसाठी रस्त्यावर उतरून आंदोलन करावे लागेल, असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रभाकर बांगर यांनी दिला.

> सरकारला अनुदान द्यायचे नसेल तर नका देऊ. परंतु, दुधामध्ये 25 ते 30 टक्के जी भेसळ होत आहे, ती थांबविणे गरजेचे आहे. भेसळयुक्त दुधामळे ग्राहकांचे आरोग्य धोक्यात आले आहे आणि दुसऱ्या बाजूला या भेसळीमुळे अतिरिक्त दूध बाजारामध्ये येत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या दुधाला भाव मिळत नाही. दुधातील भेसळ रोखण्यासाठी राज्य सरकारने कठोर भूमिका घेणे गरजेचे आहे. या दूध भेसळखोरांना अन्न आणि औषध प्रशासन यांचे अधिकारी पाठीशी घालण्याचे काम करत आहेत. केवळ दुधातील भेसळ रोखली, तर दुधाचा तुटवडा निर्माण होऊन दुधाला 50 रुपये लिटरपर्यंत भाव मिळू शकतो. याबाबत राज्य सरकारने तातडीने कठोर पावले उचलण्याची गरज आहे.
>
> - प्रभाकर बांगर, जिल्हाध्यक्ष, स्वाभिमानी शेतकरी संघटना, पुणे

# वृक्ष लागवडीमुळे होणारे अतिक्रमण थांबले

## इंदापूर शहरातून जाणाऱ्या जुन्या पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर दोन्ही रस्त्याच्या मधोमध असणाऱ्या डिव्हायडरमध्ये, वृक्ष लागवड यशस्वी केली

**पुणे | प्रतिनिधी**

इंदापूर नगर परिषदेच्या माजी नगराध्यक्षा अंकिता मुकुंद शहा यांच्या कार्यकाळात इंदापूर शहरातून जाणाऱ्या जुन्या पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर दोन्ही रस्त्याच्या मधोमध असणाऱ्या डिव्हायडरमध्ये, वृक्ष लागवड यशस्वी केली होती. नगरपरिषदेचे कर्मचारी सातत्याने या वृक्ष लागवडीची काळजी घेत असल्यामुळे, इंदापूर शहराला उभ्या असणाऱ्या चांगल्या झाडांमुळे शोभा आलेली आहे.

इंदापूर शहरात राज्याचे क्रीडा व अल्पसंख्यांक विकास मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या माध्यमातून नागरिकांना मूलभूत सुविधा सहजगत्या सुलभतेने निर्माण होण्यासाठी, राज्य शासनाचा कोट्यवधी रकमेचा निधी या शहराच्या विकासासाठी आलेला आहे. यामध्ये रस्ते, गटारी तसेच विविध विकास कामे सुरू आहेत. शहरातील प्रत्येक रस्ता चकाचित होत असल्यामुळे नगरपालिकेने पूर्वी केलेले वृक्षारोपण शहराच्या वैभवात भर घालत आहे.



इंदापूर नगर परिषदेचे मुख्याधिकारी रमेश ढगे यांनी नगर परिषदेत चार्ज घेतल्यापासून, अत्यंत बारकाईने शहराच्या लहान – मोठ्या विकास कामांवर, इंदापूर शहरातील प्रत्येक नागरिकांना विश्वासात घेऊन, नगरपालिकेचे कामकाज प्रशासन कालावधीत देखील अत्यंत प्रभावी ठेवले आहे. नगरपालिकेने उभारलेले वृक्ष उद्यान बायोडायव्हर्सिटी, रस्त्याच्या डिव्हायडरमधील यशस्वी वृक्षारोपण, उन्हाळ्याची चाहूल लागताच इंदापूर शहरात येणाऱ्या सर्वच नागरिकांना चांगला नजराणा निर्माण करून देत आहे.

### स्थानिक व्यापाऱ्यांकडून मदत

» इंदापूर शहरात खत विक्रेते फर्टीलायझर व्यापारी सांडलेले खत इंदापूर नगर परिषदेच्या वृक्ष लागवडीसाठी अनेक वेळा उपलब्ध करून देतात. त्यामुळे येथील झाडांचा पोत वाढण्यासाठी मोठी मदत होते.

अकलूज इंदापूर रस्ता, तसेच इंदापूर बारामती रस्ता, पालखी स्थळ येथे वृक्षारोपण करून, हे वृक्षारोपण जपण्याचे काम इंदापूर नगरपालिकेचे कर्मचारी अहोरात्र घेत आहेत. इंदापूर बारामती रस्त्यालगत, नगरपालिकेने वृक्षारोपण केल्यामुळे कोणालाही अतिक्रमण करता आले नाही. तसेच या वृक्ष लागवडीमुळे नैसर्गिक समतोल मोठ्या प्रमाणात साधला जात आहे. नवीन बाजार समिती पर्यंत इंदापूर नगर परिषदेने आणखी वृक्षारोपण करून, स्वच्छ सुंदर हरित इंदापूर निर्माण करावे अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केलेली आहे. शहरातील प्रत्येक रस्ता चकाचित होत असल्यामुळे नगरपालिकेने पूर्वी केलेले वृक्षारोपण शहराच्या वैभवात भर घालत आहे. नगरपरिषदेचे कर्मचारी सातत्याने या वृक्ष लागवडीची काळजी घेत असल्यामुळे, इंदापूर शहराला उभ्या असणाऱ्या चांगल्या झाडांमुळे शोभा आलेली आहे.